# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३८६/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| डॉ. वैशाली पंकज वीर<br>रा. मु. पो. आगाखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक, नाशिक ४२२५०२. | शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, ता. जि. नाशिक. | शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, ता. जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक –१४/०१/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६/११/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/११/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१३ ते सन २०२० अखेर

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** रेवती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित. १) आपल्या कार्यालयाकडुन बायजाबाई माध्यमिक विद्यालय, पिंपळे (खुर्द) पाडगण ता. कळवण या शाळेचा मा. शिक्षण संचालक यांचेकडे गेलेला १) मुल्यांकन प्रस्ताव २) मुल्यांकन गुणदान तक्ता. ३) शि.अ. कार्यालयाने मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठविलेला गुणदान तक्ता. अ) शासनाकडून शासन निर्णय दि. १५ नोव्हेंबर २०११ व दि.१६ जुलै २०१३ अन्वये वेळोवळी अघोषित शाळांची माहिती मागविण्यात आलेली होती. त्यानुसार प्रस्तुत शाळेचा जेवढया वेळा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केला ती सर्व माहिती उपलब्ध व्हावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, यांनी दि. २४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नाशिक यांना अधिनियमाच्या कलम ६(३)(२) मधील तरतुदीनुसार हस्तांतरित केला असल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपील -

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७/१२/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड यांनी कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** –

- **जन माहिती अधिकारी** – दि. २४/११/२०२१ च्या पत्रान्वये माहिती अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. नाशिक यांच्या कडे वर्ग केला असल्याचे दिसून येते. सदर चा अर्ज वैयक्तिक वादातुन सादर केला आहे.

६. **निष्कर्ष** –

(१) अपिलार्थी यांनी माहिती अर्जात माहितीशी संबंधीत कालावधी सन २०१३ ते सन २०२० अखेर असा नमुद केला असून सन २०१३ च्या कोणत्या दिनांकापासून व सन २०२० च्या कोणत्या दिनांक पर्यंत माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नसल्यामुळे माहितीचा अर्ज मोघम स्वरुपाचा ठरतो

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अर्ज वर्ग केला असल्याचे दिसून येते.

(३) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले दिसून येत नाहीत.

(४) सदर अर्ज वर्ग केला आहे परंतु अपिलार्थी यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. नाशिक यांना प्रतिवादी केलेले नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

(२) शिक्षण आयुक्त पुणे, यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

(३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१३८६/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

शिक्षण आयुक्त, शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ ॲनी बेझंट रोड, पुणे-४११००१

जावक क्र. ४८५०        30 JUN 2025